ड

FORM-1 A — N.C.R.B. — I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No.: 18, वर्ष Year: 2023, दिनांक Date: 13/04/2023

2. (i) अधिनियम Act: भ्र.प्र.अधि 1988, कलमे Sections: 13(1)3
   (ii) अधिनियम Act: भा.द.वि., कलमे Sections: 465, 466, 467, 468
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: 471, 34

3. (a) अपराधाची घटना : वार ...., तारीख पासून 8/3/2017, वेळ ...., तारीख पर्यंत 24/03/2017, वेळ ....
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S.: तारीख Date 23/09/2022, वेळ Time ....
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: लेखी 51, तारीख Date 13/04/23, वेळ Time 20.05

4. माहितीचा प्रकार Type of Information : 22 km ड लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ....

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S.: 22 km उत्तर, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ....
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: प्रादे. परि. कार्यालय मुंबई (प), ठिकाणाचे नंबर No. if any ...., गल्ली Ward ...., रस्त्याचे नाव Name of road ....
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ...., गाव Village ...., पोस्ट Post ...., तालुका Taluka ...., जिल्हा Distt. ...., राज्य State ....
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ...., तालुका Taluka ...., जिल्हा Distt. ...., राज्य State ....

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: आबासाहेब पाटील (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: आनंदराव पाटील
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: 02/06/1972 51 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: 7722003158
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ...., दिल्याचा दिनांक Date of Issue ...., दिल्याचे ठिकाण Place of Issue ...., (f) व्यवसाय Occupation: नोकरी
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste: मराठा, जनजात Sub-Caste ....
   (h) पत्ता Address : 1606, गल्ली / सर्वे नं. Ward श्री शोपीनाथ, घर / नाव नंबर House/Name No. ...., फोन /मो. नंबर Phone/M. No. ...., पॅन नं. Pan No. ...., वोटर्स नं. Card No. ....
   रस्त्याचे नाव Road: पारसिक नगर, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: सकलीश्रम कळवा, गाव Village ...., पोस्ट Post ...., पो. स्टे. P. Stn. ....
   तालुका Taluka: ठाणे, जिल्हा Distt.: ठाणे, राज्य State: महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address: 1606 श्री शोपीनाथ सकलीश्रम पारसिक नगर, कळवा, ठाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B or attach FIR 1-B to case diary.)
   1) श्री गोविंद सैदाणे, तत्कालीन उप प्रादेशिक परिवहन अधि., मुंबई (प)
   2) श्रीमती उर्फी तिमोती डिसिल्वा रा. वांद्रा (प.) मुंबई
   3) रहेमान इक्बाल अहमद शेख, रा. मुंबई
   4) इतर लोकसेवक व खाजगी इसम

यातील फिर्यादि श्री. आबासाहेब आनंदराव पाटील यां
सोबत जोडलेला स्वतंत्र पानावर टंकलिखित केलेला ज
हाच गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल समजण्यात
यावा.

समक्ष

(उमेश पाटील)
सहाय्यक पो. आयुक्त,
ला. प्र. वि. मुंबई विभाग

सही

(आबासाहेब पाटील)
सहाय्यक पो. आयुक्त,
ला. प्र. वि. मुंबई विभाग

24 (२४)

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

ता.म. वेळी व ठिकाणी सीमाशुल्क कायदा 1962 च्या तरतुदीचा गैरफायदा घेऊन परदेशी मुत्सद्दींचे (Foreign diplomat) यांचे नावे कार क्र 1) MH-02-EM-4005 2) MH-02 FL-8055 आयात करुन आरोपी क्र 3 याने त्याचे इतर साथीदाराचे मदतीने आरोपी क्र 2 याचे नावे बनावट व खोटी कागदपत्रे बनवून ती प्रादेशिक परिवहन कार्या मुंबई (प.) येथे सादर केली व आरोपी क्र 1 यांनी सदर कार क्र MH02-EM-4005 चे कागदपत्रांची पडताळणी न करता बेकायदेशीर वाहन नोंदणी करुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन करुन शासकीय महसुलाची हानी केली म्हणून गुन्हा.

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..........., जिल्हा ..........., राज्य ...........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................. Rank................. No. ............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .............................................. (3) Transferred to P.S ..............................................,
District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

[signature]
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name उमेश दादासो पाटील
पदनाम Rank सहाय्यक पोलीस आयुक्त
तपासिक अं. चा कोड. क्र. ...........
Posting ला.प्र.वि. मुंबई
Code No. of I. O. ...........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

फिर्याद दि. १३/०४/२०२३

श्री. आबासाहेब आनंदराव पाटील, वय ५१ वर्षे, धंदा–नोकरी, ( सहाय्यक पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई), रा.ठी. १६०६,श्री. गोपीनाथ सबलाईम, पारसिकनगर, कळवा, ठाणे (पश्चिम) पिन नं. ४००६०५, मो. नं. ७७२२००३१५८

मी, वरील प्रमाणे असुन ऑगस्ट–२०१९ पासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे कार्यरत आहे. आम्हास मा. अपर पोलीस उप आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील क्र. ९३४७/लाप्रवि/बृमुंवि/उ.चौ.क्र. २६/२२, दि. २०/१०/२०२२ अन्वये ज्ञापन प्राप्त झाले नमुद पत्रात प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई पश्चिम यांच्या कार्यक्षेत्रातील बेकायदेशीर वाहन नोंदणी प्रक्रियेशी असणाऱ्या सबंधीत अधिकारी व कर्मचारी यांची भुमिका तपासुन अहवाल सादर करण्याकरीता सदर प्रकरणी उघड चौकशी क्र. २६/२०२२ अन्वये चौकशी सुरु करण्यास मा. महासंचालक, ला.प्र.वि. म.रा. मुंबई यांनी दि. १८/१०/२०२२ रोजी मान्यता दिली आहे. प्रस्तुत प्रकरणी उघड चौकशी तात्काळ करुन अहवाल सादर करण्याकरीता मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांनी चौकशी अधिकारी म्हणुन आमची नेमणुक केली.

सदर ज्ञापना सोबत मा. प्रधान सचिव (परिवहन व बंदरे) म.शा. मंत्रालय मुंबई यांनी मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा. मुंबई यांना अ.शा.प.क्र. एमव्हीडी–०८२२/प्र.क्र.२१६/परि–४, दि. २३/०९/२०२२ हे पाठविले असुन त्यामध्ये सीमाशुल्क कायदा, १९६२ च्या तरतुदींचा गैरफायदा घेऊन सध्या दुबई येथे राहणारा रेहमान इक्बाल अहमद शेख याच्या नेतृत्वाखालील तस्करी सिंडिकेटने परदेशी मुत्सद्यांचे (Foreign Diplomat) नावे बनावट कागदपत्रांच्या आधारे दोन विदेशी कारची आयात करुन अनुक्रमे MH-02-FL-8055 व MH-02-EM-4005 या नोंदणी क्रमांकाने प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पश्चिम) यांच्या कार्यक्षेत्रात नोंदणी केली आहे. सदरील सिंडीकेटच्या बेकायदेशीर कार्यपध्दतीमुळे सुमारे रु. २५ कोटी इतक्या रक्कमेच्या शासकीय महसूलाची हानी झाली आहे. या बेकायदेशीर वाहन नोंदणी प्रक्रियेशी सहभागी असणाऱ्या संबंधित असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची भुमिका तपासण्यात यावी असे नमुद आहे.

तसेच वर नमुद अर्धशासकीय पत्रासोबत मा. अतिरिक्त महासंचालक (प्र.), गुप्तचर संचालनालय, भारत सरकार, मुंबई यांचेकडील क्र. DRI/MZU/NS-1/ENQ-51/2021/256, Dt. 08/082022 अन्व्ये मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांना पाठविलेले पत्र असुन त्यामध्ये वरील प्रमाणे हकीकत असुन परिशिष्ठ–१ मध्ये कार क्र. १) MH-02-FL-8055 हि निस्सान पेट्रोल कार असुन प्रकाश धर्मा दोडीया यांचे नावे नोंदणी झाली आहे. सदरची कार हि JONG YONG RYONG, Embassy of Korea या परदेशी मुत्सद्याचे नांवे आयात केली असुन त्याचा Bill of Entry No. 6293298, Dt 30/12/2019 असा आहे. तसेच २) MH-02-EM-4005 हि टोयाटो व्हेलफायर कंपनीची असुन हुमायुन अबुबकर चांदीवाला यांचे नांवे नोंदणी झाली आहे. सदरची कार हि PANG SI ON या परदेशी मुत्सद्याचे नांवे आयात केली असुन त्याचा Bill of Entry No. 7073812, Dt 14/10/2016 असा आहे. असे नमुद आहे.

वरील नमुद पत्रांच्या अनुषंगाने आम्ही चौकशी अधिकारी म्हणुन चौकशी करण्याकरीता प्रस्तुत प्रकरणातील विदेशी वाहन MH-02-FL-8055 व MH-02-EM-4005 यांच्या नोंदणीचे कागदपत्र मिळण्याकरीता प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पश्चिम) यांना इकडील जा.क्र. ९९२८/लाप्रवि/बृमुंवि/उ.चौ.२६/२२/२०२२, दि. १४/११/२०२२ अन्वये पत्र व्यवहार केला. त्याप्रमाणे त्यांचे कार्यालया कडील पत्र क्रमांक :– प्रापका/मुं.

(प)/आयातीत वाहन/जा.क्र.७९४४, दि. १७/११/२०२२ अन्वये नमुद दोनही वाहनांची माहिती प्राप्त झा झाली, ती माहिती पुढील प्रमाणे आहे.

वाहन क्र. MH-02-EM-4005 या वाहनाची मुळ नोंदणी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई पश्चिम येथे दि. २४/०३/२०१७ रोजी इफ्फी तीमोथी डिसिल्वा, राहाणार– २७.–बी/ए, चॅपेल रोड, नरोन्ना स्टोअर जवळ, बांद्रा (प.), मुंबई–४०००५० यांच्या नांवे झाली आहे. त्यानंतर द्वितीय हस्तांतरण प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई पश्चिम येथे दि. २१/१०/२०१८ रोजी हुमायुन अबुबकर चांदीवाला , राहाणार– क्वॉर्टर डेक, नववा माळा, जेपी रोड, पिकनिक कॉटेल जवळ, सात बंगला , अंधेरी (पश्चिम), मुंबई–४०० ०६१ यांच्या नांवे झाली आहे. त्यानंतर तृतीय हस्तांतरण उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली, मुंबई येथे दि. ०४/०४/२०२२ रोजी गटट्टा श्रीनिवासाराव राहाणार रुम नं. बी–१७, मालवणी, वक्रतुंड को.ऑ.हौ.सो. प्लॉट नं. १९, आर.एस.सी.–८, ॲक्सिस बॅक एटीएम जवळ, म्हाडा (पश्चिम), मुंबई–४०००९५ यांच्या नांवे नोंदविण्यात आली आहे.

तसेच वाहन क्र. MH-02-FL-8055 या वाहनाची मुळ नोंदणी सेनापती परिवहन कार्यालय, मणीपूर ये दि. १२/०२/२०२० रोजी झाली असुन त्याचा मुळ क्र. MN-03-P-3946 असा असुन सदरचे वाहन मीनाराणी देवी, राहाणार–सबी लेईराक वांगखेई, निंगथेन पुखार वांगखेई इन्फाळ पुर्व, मणीपूर–७९५००५ तसेच पुनर्नोंदणी व द्वितीय हस्तांतरण प्रादेशिक परिहवन कार्यालय, मुंबई पश्चिम येथे दि. १४/१२/२०२० रोजी इम्रान हुमायुन चांदीवाला राहाणार– क्वॉर्टर डेक, नववा माळा, जेपी रोड, पिकनिक कॉटेल जवळ, सात बंगला , अंधेरी (पश्चिम), मुंबई–४०० ०६१ यांचे नांवे नोंद झाली आहे.

वर नमुद दोन्ही वाहनांचे राजस्व आसूचना निदेशालय **(DRI),** न्हावासेवा, मुंबई विभाग यांचेकडुन कागदपत्र मागविण्यात आले, त्यांचेकडुन प्राप्त झालेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता टोयाटो व्हेलफायर कार क्र. **MH-02-EM-4005** हि कार टोयोटा व्हेलफायर कंपनीची असुन दुबई येथुन आयात केलेली आहे. सदर कार आयात करण्यासाठी कोरीयन दुतावासातील परदेशी मुत्सदी **PANG SI ON** या अधिकाऱ्याने भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडे दि. ०२ सप्टेंबर २०१६ रोजी अर्ज सादर केला. त्यास अनुसरुन भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने पुर्व मंजुरी व कस्टम डयुटी माफ केल्याबाबतचे प्रमाणपत्र दि. ०३/१०/२०१६ रोजी दिले. कोरीयन दुतावासाने त्याच दिवशी सदर कार आयात करण्याकरीता मेसर्स बाबाजी शिवराम क्लीअरींग ॲन्ड कॅरीयर्स प्रा.लि. चेन्नई यांची नियुक्ती केल्याबाबतचे पत्र असिस्टंट कमिशनर ऑफ कस्टम, चेन्नई यांना दिले.

उपरोक्त प्रमाणे शासकीय पत्र व्यवहार झाल्यानंतर दुबई येथुन जी.के. मोटर्स, दुबई यांनी सदरची कार पेरमा शिपिंग लाईन (इंडीया प्रा.लि.) या डिलिव्हरी एजंटच्या मार्फतीने कोरीयन राजदुत नामे **PANG SI ON,** यांचे नावे दि. १४/१०/२०१६ रोजी चेन्नई पोर्ट येथे आयात केली. त्याचा **Bill of Entry No. 7073812, Dt 14/10/2016** असा आहे. त्यानंतर सीएचए कंपनी नामे मेसर्स बाबाजी शिवराम क्लीअरींग ॲन्ड कॅरीयर्स प्रा.लि. चेन्नई यांनी सदरची कार चेन्नई पोर्ट येथुन कस्टमच्या सर्व प्रक्रिया पार पाडुन ताब्यात घेवुन आयातदार नामे **PANG SI ON** यांचे ताब्यात देणे आवश्यक असताना सदर कार अनोळखी इसमांचे ताब्यात दिली, परंतु डीलीव्हरी चलनावर कार ताब्यात घेणाऱ्या इसमाचे नांव व सही घेतली नसल्याचे दिसून येते.

त्यानंतर Smt. EFFIE TIMOTHY DSILVA राहाणार–२७–बी/ए, चॅपेल रोड, नरोन्हा स्टोअर्सच्या मागे, बांद्रा (पश्चिम),मुंबई–४०००५० हिच्या नावाचे Bill of Entry, Customs clearance Certificate, G K Motor's invoice bill, Perma Shipping Pvt Ltd Bill of lading अशी बनावट कागदपत्रे बनवुन रहेमान इक्बाल अहमद शेख, याने त्याचे हस्तका मार्फत प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई पश्चिम येथे सदरची कार नोंदणी करण्याकरीता अर्ज सादर केला.

नमुद कार क्र. MH-02-EM-4005 हि प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई पश्चिम येथे नोदणी करीता आली असता तत्कालीन मोटार वाहन निरीक्षक श्री अभिजीत गायकवाड (सध्या मयत) यांनी नमुद कारचे निरीक्षण केले. त्यांनी त्यावेळी त्यांचे वाहन निरीक्षण प्रमाणपत्रामध्ये "When verified Motor Vehical details on Icegate Website not found. They have paid manual challan in customs at SBI Bank . Hence, customs clearance certificate required." असा आक्षेपार्ह शेरा दि. ०८/०३/२०१७ रोजी लिहीलेला आहे. मोटार वाहन निरीक्षक श्री गायकवाड यांनी सदर वाहनाचे नोंदणी करीता उपरोक्त प्रमाणे आक्षेप नोंदविले असताना देखील त्याच दिवशी तत्कालीन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई पश्चिम श्री. गोविंद सैदाणे यांनी सदर कारचे निरीक्षण प्रमाणपत्रावर " Hold up R.C. for customs clearance certificate" असा शेरा निरीक्षण प्रमाणपत्रावर नमुद केला आहे. सदर कारचे Bill of Entry, Customs clearance Certificate हे खरे आहे अथवा खोटे याबाबत खात्री करणेकरीता कस्टम हाऊस चैन्नई येथे दि. ०८ मार्च २०१७ रोजी पत्र व्यवहार केला परंतु सदर पत्राचे उत्तर प्राप्त होण्याअगोदर नमुद कारची दि. २४/०३/२०१७ रोजी नोंदणी केली. दि. २९/०३/२०१७ रोजी कस्टम हाऊस, चेन्नई यांनी प्रादेशिक परिवहन कर्यालय, मुंबई पश्चिम यांना पत्र व्यवहार करुन त्यानी दिलेला Bill of Entry No 9472362 Dt. 30/09/2016 हा त्यांचेकडील उपलब्ध माहितीमध्ये कोठेही दिसुन येत नसल्याचे कळवुन सविस्तर तपासणी करण्याकरीता प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई पश्चिम यांचेकडे उपलब्ध Bill of Entry ची प्रत मागविली होती त्यानुसार त्यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली Bill of Entry ची प्रत कस्टम हाऊस, चेन्नई यांना दि. १६/०५/२०१७ रोजी पाठविली होती. त्यानंतर दि. ०६/०६/२०१७ व दि. १८/०४/२०१८ अन्वये पत्र व्यवहार करण्यात आला आहे, परंतु सदर पत्राचे उत्तर प्राप्त होण्याअगोदर नमुद कारची दि. २४/०३/२०१७ रोजी नोंदणी केली व नोंदणी प्रमाणपत्र देखील कार मालकास दिले. यावरुन उप प्रादेशिक परिहवन अधिकारी, श्री. गोविंद सैदाणे यांनी वाहनाची नोंदणी करताना कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक होते तसे न करता त्यांनी कर्तव्यात कसुर करुन गुन्हेगारी स्वरुपाचे गैरवर्तन केले आहे असे केलेल्या चौकशीत दिसुन येत आहे

तरी वाहन क्र. MH-02-EM-4005 हि टोयाटो व्हेलफायर कंपनीची परदेशी कार दुबई येथुन भारतात कोरीयन राजदुत PANG SI ON यांचे नांवे Bill of Entry No. 7073812, Dt 14/10/2016 अन्वये चैन्नई पोर्ट येथे आयात केलेली कार कोरीयन राजदुत PANG SI ON यांचे ताब्यात देणे आवश्यक असताना रहेमान इक्बाल अहमद शेख, याने त्याचे हस्तका मार्फत Smt. EFFIE TIMOTHY DSILVA याचे नांवे खोटी व बनावट कागदपत्र तयार करुन प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई पश्चिम येथे सादर केली. त्यानंतर तत्कालीन मोटार वाहन निरीक्षक श्री अभिजीत गायकवाड (सध्या मयत) यांनी नमुद कारचे निरीक्षण करुन त्यांनी त्यांचे वाहन निरीक्षण प्रमाणपत्रामध्ये "When verified Motor Vehical details on Icegate Website not found. They have paid manual challan in customs at SBI Bank . Hence, customs clearance certificate required." असा आक्षेपार्ह शेरा दि. ०८/०३/२०१७ रोजी लिहीलेला असताना देखील तत्कालीन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई पश्चिम श्री. गोविंद सैदाणे यांनी सदर कारचे निरीक्षण प्रमाणपत्रावर " Hold up R.C. for customs clearance certificate"

असा शेरा निरीक्षण प्रमाणपत्रावर नमुद करुन नमुद कारची दि. २४/०३/२०१७ रोजी नोंदणी केली व नोंदणी प्रमाणपत्र देखील कार मालकास दिले. यावरुन उप प्रादेशिक परिहवन अधिकारी, श्री. गोविंद सैदाणे यांनी वाहनाची नोंदणी करताना कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक होते तसे न करता त्यांनी कर्तव्यात कसुर करुन गुन्हेगारी स्वरुपाचे गैरवर्तन केले आहे म्हणुन माझी श्री. गोविंद सैदाणे, तत्कालीन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई पश्चिम, कार मालक Smt. EFFIE TIMOTHY DSILVA , रहेमान इक्बाल अहमद शेख, तसेच इतर लोकसेवक व खाजगी इसम यांनी संगनमत करुन नमुद वाहनाची बनावट व खोटी कागदपत्रे तयार करुन लोकसेवकाने गुन्हेगारी स्वरुपाचे गैरवर्तन करुन, बेकायदेशीर वाहन नोंदणी करुन, शासकीय महसुलाची हानी केली म्हणुन माझी वरील सर्व इसमांविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( उमेश पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबधंक विभाग,
मुंबई

( आबासाहेब आनंदराव पाटील )